**निवडणूक कर्तव्यावर असताना जखमी झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना व मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीईएल-२०१९/प्र.क्र.४७०/१९/३३**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०२१

**वाचा :** १) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक २१८/६/२०१९-EPS, दिनांक १०.०४.२०१९
२) सामान्य प्रशासन विभाग समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक ११.०४.२०१९
३) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक २१८/६/२०१९-EPS, दिनांक २२.०७.२०२०
४) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक २१८/६/२०१९-EPS, दिनांक १४.०९.२०२०

**प्रस्तावना :-**

भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारितील राज्यसभा, लोकसभा, विधान परिषद व विधानसभेच्या सार्वत्रिक आणि पोट निवडणुकांसाठी मोठया प्रमाणावर अधिकारी व कर्मचारी वर्ग निवडणूक कर्तव्यार्थ नेमण्यात येतो. निवडणूक कर्तव्ये ही शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण कर्तव्यापेक्षा वेगळया प्रकारची असतात व ती केवळ मर्यादीत वेळेत पूर्ण करत असताना त्यांना जोखीम आणि धोका यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे निवडणूक कर्तव्यावर असताना जखमी झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना व मृत झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटुबियांना सहानुभूतिपूर्वक विचार करुन संदर्भाधिन क्र.२ येथे नमूद करण्यात आलेल्या दिनांक ११.०४.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सानुग्रह अनुदान प्रदान करण्यात येते.

भारत निवडणूक आयोगाच्या दि.२२.०७.२०२० च्या पत्रान्वये निवडणूक कर्तव्यार्थ असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान अदा करण्यासंदर्भात “कोव्हीड-१९ आजाराने मृत्यू” या बाबीचा समावेश करणे आणि निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसहीत CAPF व BEL/ECIL अभियंते/अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करणेबाबत निर्देश दिले आहेत.

भारत निवडणूक आयोगाच्या दि.१४.०९.२०२० च्या पत्रान्वये निवडणूक कर्तव्यार्थ असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान अदा करण्यासंदर्भात “ईव्हीएम / व्हीव्हीपॅट तयारीच्या सर्व प्रक्रियेदरम्यान नियुक्त केलेले निवडणूक अधिकारी/कर्मचारी/अभियंते यांना मतदान अधिकारी/ कर्मचारी म्हणून समजण्यात यावे आणि त्यानुसार त्यांना सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील” असे समावेशन करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

उपरोक्तप्रमाणे भारत निवडणूक आयोगाने निर्देशित केलेले मुद्दे निवडणूक कर्तव्यार्थ असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान प्रदान करण्याच्या शासन निर्णयात समाविष्ट करण्याची बाब विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संदर्भाधिन समक्रमांकाच्या दिनांक ११.०४.२०१९ च्या शासन निर्णयात पुढीलप्रमाणे बाबी समाविष्ट करण्यात येत आहेत :-

(अ) सदर शासन निर्णयातील परिच्छेद-१ खालील सानुग्रह अनुदानाचा तपशील या तक्त्यातील अनुक्रमांक-२ मध्ये निवडणुकीच्या वेळी कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्बस्फोट, सुरुंग अथवा शस्त्रास्त्राचा हल्ला (Road Mines, Bomb Blasts, Armed Attack etc.) यामध्ये मृत पावलेले अधिकारी/कर्मचारी यांचे वारस रु.३०,००,०००/- इतके सानुग्रह अनुदान अनुज्ञेय आहे. याप्रमाणेच निवडणुकीच्या वेळी

कर्तव्यार्थ असताना "**कोव्हीड-१९ आजार**" या मध्ये मृत पावलेले अधिकारी/कर्मचारी यांचे वारसांना रु.३०,००,०००/- इतके सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील.

(ब) सदर शासन निर्णयातील परिच्छेद-२ मध्ये या शासन निर्णयासाठी निवडणूक कर्तव्य याचा अर्थ संबंधीत अधिकारी/कर्मचारी हे निवडणुकीच्या कर्तव्यासाठी आपल्या घरातून / कार्यालयातून बाहेर पडल्यापासून ते निवडणुकीशी संबंधीत कर्तव्ये पार पाडून आपल्या कार्यालयात/घरी परत येईपर्यंतचा कालावधी असा समजण्यात यावा. निवडणुकीशी संबंधीत कर्तव्ये यामध्ये निवडणुकीच्या कामासाठी दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा देखील समावेश असा आहे. याबरोबरच आता **ईव्हीएम / व्हीव्हीपॅट तयारीच्या सर्व प्रक्रियेदरम्यान नियुक्त केलेले निवडणूक अधिकारी/कर्मचारी/अभियंते यांना मतदान अधिकारी/ कर्मचारी म्हणून समजण्यात यावे.** त्यानुसार त्यांना या शासन निर्णयातील सानुग्रह अनुदानाचे लाभ अनुज्ञेय राहतील.

(क) सदर शासन निर्णयातील परिच्छेद-३ मध्ये निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त अधिकारी/कर्मचारी यामध्ये केंद्र शासन, राज्य शासन, निमशासकीय इतर प्राधिकरण तसेच इतर खाजगी आस्थापना की ज्यातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा निवडणुकीच्या कामासाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत असे अधिकारी / कर्मचाऱ्यांसहीत **केंद्रीय सशस्त्र पोलीस दल** CAPF (Central Armed Police Forces) **व** BEL / ECIL (Bharat Electronics Limited / Electronic Corporation of India Limited) **अभियंते /अधिकारी /कर्मचारी** यांचा समावेश राहील.

२. हे आदेश दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२१ पासून लागू राहतील.

३. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १७/२०२१/व्यय-४, दिनांक १९.०१.२०२१ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०२०३१६५५३५४००७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL NANSING VALVI

Digitally signed by ANIL NANSING VALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=1a7c28200f6d58206324d8086ffcf99758c115aada508a7437f2ae5d9fa1ba5d, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=328a78fb26991ef7b9493ea647f585c65b1cf01913ae44b41ffee5cc8464f2f1, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ANIL NANSING VALVI
Date: 2021.02.03 17:01:28 +05'30'

**( अ. ना. वळवी )**
**उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
६. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव

७. सर्व विभागीय आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी
९. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. कार्यासन (व्यय-४, व्यय-९ व अर्थ-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३. निवड नस्ती (कार्या.३३).